**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**४१२, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,**
**शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६**
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६११११५३

क्रमांक : उशिसं/२०२४/परीक्षा/गट-क/प्रशा-२ दिनांक ०९.०७.२०२४

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत घेण्यात येणाऱ्या विभागीय सेवाप्रवेशोत्तर व पर्यवेक्षकीय परीक्षेचा अभ्यासक्रम व परीक्षा आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ :** १.मा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांची अधिसूचना क्रमांक मरापप/वि.से.प्र.प./अधिसूचना/२०२४/२५५०, दिनांक १२.०६.२०२४
२.शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.८३/मशि-१, दिनांक ०१.०७.२०२४

उपरोक्त संदर्भीत विषयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा २०२४ अधिसूचना दिनांक १२.०६.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आलेली असून लिपिक व टंकलेखक या पदासाठी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व सध्या मुख्य लिपिक पदावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पर्यवेक्षकीय परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी परिषदेच्या संकेतस्थळावर दिनांक १७.०६.२०२४ ते ३०.०६.२०२४ पर्यंत ऑनलाईन आवेदन पत्र भरण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तसेच कार्यालय प्रमुख यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना दिनांक ०८.०७.२०२४ पर्यंत पाठविणे बंधनकारक असल्याचे कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने संचालनालयाचे पत्र क्रमांक उशिसं/२०२४/प्रवेशोत्तर-पर्यवेक्षकीय परीक्षा २०२४/प्रशा-२/३३९७, दिनांक २६.०६.२०२४ च्या पत्रान्वये संचालनालयस्तरावर व विभागीय सहसंचालक कार्यालयांना कळविण्यात आलेले होते.

तथापि, शासन पत्र दिनांक ०१.०७.२०२४ अन्वये उच्च शिक्षण विभागाद्वारे विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय परीक्षेचा अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उच्च शिक्षण संचालनालयाद्वारे सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय परीक्षा संचालनालय स्तरावर परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व पात्र उमेदवारांनी याबाबतची नोंद घेण्यात यावी.

नव्याने अथवा प्रथमत: सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय परीक्षा देणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी उच्च शिक्षण संचालनालयामार्फत आयोजित करण्यात येणारी परीक्षा देणे बंधनकारक राहील.

**१) लिपिक / लिपिक-टंकलेखक / कनिष्ठ लिपिक पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा :**

शासन अधिसूचना क्रमांक इएक्सएम/१२६४ सी, दिनांक ३०.०७.१९७३ मधील परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या नियमाप्रमाणे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : विपधो २६२०/प्र.क्र.१६/ का.१७, दिनांक ३१.०३.२०२१ नुसार तसेच खालील अटी पूर्ण करणारे उमेदवार सदर परीक्षेसाठी पात्र आहेत.

१) ज्या लिपिकांचे खात्यामार्फत प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे.
२) जे लिपिक यापूर्वी झालेल्या परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत.
३) परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे.

कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण पूर्ण झाले नसल्यास सदर लिपिक / लिपिक-टंकलेखक / कनिष्ठ लिपिक यांना परीक्षेस बसता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**उत्तीर्णतेचे निकष :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : विपधो २६२०/प्र.क्र.१६/ का.१७, दिनांक ३१.०३.२०२१ नुसार सदर परीक्षेसाठी उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

१) लिपिक सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहेत.
२) एखाद्या परीक्षार्थ्यास एका विषयात ५० किंवा ५०% पेक्षा अधिक गुण मिळाल्यास त्यास त्या विषयात पुढील परीक्षेसाठी सूट मिळू शकते. तथापि, त्यासाठी अशा उमेदवारांनी आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकांची प्रत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षार्थी सर्व विषयास बसू इच्छितो, असे गृहित धरले जाईल व त्याप्रमाणे निकाल जाहीर केला जाईल.
३) एखाद्या परीक्षार्थ्यास एकूणात ५०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असतील व तो एका विषयात अनुत्तीर्ण असेल तर त्यास सर्व परीक्षा पुन्हा द्यावी लागणार नाही. ज्या विषयात तो नापास असेल त्याच विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

**परीक्षेचे विषयांचा तपशिल खालीलप्रमाणे :**

| अ. क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | पेपर - १ (कार्यालयीन व्यवस्थापन) (पुस्तकाशिवाय) | १०० |
| २ | पेपर - २ (कार्यालयीन पध्दती, टिप्पणी, मसुदा लेखन) (पुस्तकाशिवाय) | १०० |
| ३ | पेपर - ३ (सर्वसाधारण अधिनियम व नियम) (पुस्तकांशिवाय) | १०० |
| ४ | पेपर - ४ (महाराष्ट्र नागरी सेवा नियम व अधिनियम) (पुस्तकासह) | १०० |
| ५ | पेपर - ५ (लेखे व वित्तीय कार्यपध्दती) (पुस्तकासह) | १०० |

शासन नियमानुसार पात्र उमेदवारांनी आवेदनपत्रे भरण्यात यावे. या परीक्षेसाठी उमेदवार पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

**२) पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा :**

शासन अधिसूचना क्रमांक इएक्सएम/१२६४ सी, दिनांक ३०.०७.१९७३ व शासन अधिसूचना क्रमांक डीडीई-११८३/५७३८१५ (३८२३)/प्रशा-५, दिनांक २७.०७.१९९३ मध्ये नमूद केलेल्या नियमाप्रमाणे व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : विपधो २६२०/प्र.क्र.१६/ का.१७, दिनांक ३१.०३.२०२१ नुसार तसेच सध्या मुख्य लिपिक पदावर काम करणारे तसेच यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले या संवर्गातील कर्मचारी या परीक्षेसाठी पात्र आहेत.

**उत्तीर्णतेचे निकष :** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : विपधो २६२०/प्र.क्र.१६/ का.१७, दिनांक ३१.०३.२०२१ नुसार सदर परीक्षेसाठी उत्तीर्ण होण्यासाठीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

१) पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात ५०% गुण आवश्यक आहेत.

२) परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% किंवा त्याहुन अधिक गुण मिळाले असतील त्या विषयास पुढील परीक्षेसाठी सूट मिळू शकते. तथापि, त्यासाठी अशा उमेदवारांनी आवेदनपत्रात तसे नमुद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार सर्व विषयात बसू इच्छितो, असे गृहित धरले जाईल व त्याप्रमाणे निकाल जाहीर केला जाईल.

३) एखाद्या परीक्षार्थ्यास ज्या विषयात ६०% पक्षा जास्त गुण प्राप्त झाले असतील तर त्यास सर्व परीक्षा पुन्हा द्यावी लागणार नाही. ज्या विषयात तो अनुत्तीर्ण असेल त्याच विषयाची परीक्षा द्यावी लागेल.

**परीक्षेचे विषयांचा तपशिल खालीलप्रमाणे :**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | पेपर - १ (उच्च शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाज) (पुस्तकाशिवाय) | १०० |
| २ | पेपर - २ (उच्च शिक्षण विभागातील नियम / अधिनियम) (पुस्तकाशिवाय) | १०० |
| ३ | पेपर - ३ (महाराष्ट्र नागरी सेवा नियम व अधिनियम) (पुस्तकासह) | १०० |
| ४ | पेपर - ४ (लेखे व वित्तीय कार्यपध्दती) (पुस्तकासह) | १०० |

शासन नियमानुसार पात्र उमेदवारांनी आवेदनपत्रे भरण्यात यावे. या परीक्षेसाठी उमेदवार पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबधित विभागीय सहसंचालक यांची राहील.

**उपरोक्त दोन्ही संवर्गाच्या परीक्षेसंबंधी सर्वसाधारण माहिती पुढील प्रमाणे :**

१) **आवेदनपत्रे भरण्याची मुदत :** सदर लिपिक सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय या दोन संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी सबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण

यांचेमार्फत **शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, ४१२, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - ४११०१६** या पत्त्यावर **दिनांक ०९.०७.२०२४ ते १८.०७.२०२४** पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावे.

सदरचे आवेदनपत्रे विहित मुदतीत संचालनालयास प्राप्त झाल्यानंतरच तपासणीअंती अर्हताप्राप्त उमेदवार परीक्षेस पात्र ठरणार आहेत, याची नोंद घ्यावी.

२) **परीक्षा शुल्क :** लिपिक सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय या दोनही संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी परीक्षा शुल्क रु.९५०/- (अक्षरी रुपये नऊशे पन्नास मात्र) **THE DIRECTOR HIGHER EDUCATION, M.S.** यांच्या नावे धनाकर्षाद्वारे (Demand Draft) भरावयाचे आहेत.

३) **माध्यम :** परीक्षेसाठी सर्व विषयांसाठी माध्यम मराठी राहील.

४) **पुस्तकांसहित विषय :** जे विषय पुस्तकांसहित लिहावयाचे आहेत, त्यासाठी आवश्यक असणारी पुस्तके / त्यांच्या प्रमाणित छायांकीत प्रती (फक्त शासकीय प्रकाशने) उमेदवारांनी परीक्षेच्या दिवशी स्वत: आणावयाची आहेत. कोणत्याही परिस्थितीत खाजगी प्रकाशनाची पुस्तके वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच परीक्षेसाठी विहित केलेल्या प्रमाणित पुस्तकांमध्ये अथवा पुस्तकांच्या छायाकीत प्रती (Xerox) प्रतीवर अथवा अधिनियम / नियम / शासन निर्णयाच्या प्रतीवर इतर कोणत्याही प्रकारचे लिखाण केलेले नसावे तसेच पुस्तकातील अथवा अधिनियमातील वाक्ये अधोरेखीत असता कामा नयेत. विहित केलेली मूळ पुस्तके उपलब्ध नसल्यास, संबंधित विभागाच्या आस्थापना अधिकाऱ्यांनी प्रमाणित करुन दिलेल्या विहित पुस्तकांच्या छायांकीत प्रती (Xerox) परीक्षेच्यावेळी वापरण्यास परवानगी राहील.

५) **प्रवेशपत्रे :** पात्र उमेदवारांची प्रवेशपत्रे संचालनालयाद्वारे संबंधित सहसंचालक कार्यालयामार्फत परीक्षेपूर्वी १० दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरचे प्रवेशपत्र प्राप्त करावयाची जबाबदारी संबधित उमेदवाराची असेल.

६) **परीक्षा केंद्र :** उक्त अ.क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या प्रवेशपत्रामध्ये परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता नमूद केले जाईल.

७) **गुणपडताळणी :** सदर परीक्षेचा निकाल जाहीर झालेनंतर ज्या उमेदवारांना प्राप्त गुणांबाबत काही शंका असल्यास अशा उमेदवारांनी गुणांची पडताळणी अर्ज निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत संचालनालयास सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या गुणपडताळणी अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच

गुणपडताळणीसाठी अर्ज केलेल्या विषयाच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची केवळ गुणपडताळणी करुन घेता येईल. **कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेचे पुर्णमुल्यांकन केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

८) **परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या अटी व शर्ती :**

१. सदर परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमदेवारांकडे संचालनालयाने दिलेल्या विहित नमुन्यातील प्रवेशपत्र सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह सांक्षांकीत करुन परीक्षेच्या वेळी स्वत: जवळ बाळगणे बंधनकारक राहील. तसेच स्वत:ची ओळख (Identification) पटवून देणेकरीता मूळ प्रवेशपत्रासह शासकीय ओळखपत्र (आधार कार्ड / पॅनकार्ड / वाहन परवाना / निवडणूक आयोगाचे ओळखपत्र यापैकी एक) असणे आवश्यक राहील.

२. परीक्षेसाठी उमेदवाराने परीक्षा केंद्रावर अर्धा तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षा सुरु झालेनंतर अर्धा तासानंतर उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

३. परीक्षा केंद्रातील अथवा इतर कोणत्याही परीक्षा कक्षा (हॉल) मध्ये कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य भ्रमणध्वनी, ब्ल्युटूथ, गणकयंत्र, पेजर, स्मार्ट वॉच इ.) स्वत: जवळ बाळगणेस सक्त मनाई आहे.

४. परीक्षे दरम्यान जे पेपर / विषय पुस्तकांशिवाय आहेत, अशा विषयाचे पेपर सुरु असताना उमेदवारांकडे पुस्तके / कॉपी साहित्य आढळल्यास सदरची बाब गैरवर्तणूक समजून सदर उमेदवारावर Provision of Mal Practices Act, १९८२ व Public Examination (Prevention of unfair means) Act, २०२४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करणेत येईल.

५. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना संचालनालयामार्फत कोणतीही पुस्तके पुरविली जाणार नाहीत.

६. परीक्षेच्यावेळी उपस्थित उमेदवारास प्रवासभत्ता व दैनिकभत्ता संचालनालयामार्फत अदा केला जाणार नाही.

९) **उमेदवाराने परीक्षा कक्षामधून बाहेर जाणेबाबत :**

१. प्रश्नपत्रिका वाटप केल्यापासून पाऊणतास संपेपर्यंत कोणत्याही उमेदवाराला परीक्षा कक्षाबाहेर जाता येणार नाही.

२. परीक्षा चालू असताना एखाद्या उमेदवारास प्रसाधन कक्षात जावयाचे असेल तर संबंधित उमेदवाराने परीक्षा कक्षाबाहेर जाणेपूर्वी पर्यवेक्षकाची परवानगी घेणे आवश्यक राहील. तशी परवानगी घेतली नसल्यास संबंधित उमेदवाराने परीक्षा कक्षामध्ये पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

३. एखाद्या उमेदवारास परीक्षा सुरु झाल्यानंतर पाऊण तासानंतर परंतू परीक्षेची वेळ संपण्यापूर्वी परीक्षा कक्षाबाहेर जावयाचे असेल तर त्याने / तिने पर्यवेक्षकांकडे त्याचे / तिची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका जमा करणे आवश्यक राहील. जे उमेदवार पेपरच्या शेवटच्या वेळेपर्यंत परीक्षा कक्षात राहतील त्यांची / तिची उत्तरपत्रिका पर्यवेक्षक घेईपर्यंत आपल्या जागेवर बसून राहणे आवश्यक आहे.

उपरोक्त ९.१, ९.२ व ९.३ च्या अधीन राहून कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव पर्यवेक्षकाच्या परवानगीशिवाय आपली जागा सोडू नये.

१०) उमेदवाराने उत्तरपत्रिकेमध्ये प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड) सलगरित्या सोडवावेत. प्रश्नाचा एक भाग एका पृष्ठावर व दुसरा भाग काही पृष्ठे सोडून सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात यईल.

११) संचालनालयाने विभागीय परीक्षा संदर्भात केलेल्या सूचनांचे उमेदवाराने अत्यंत काळजीपूर्वक पालन करावे. सदर सूचनांचे पालन न केल्यास संबंधित उमेदवारास परीक्षा कक्षाबाहेर काढणे, गुण वजा करणे, उमेदवाराची चालू परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील परीक्षांना प्रतिबंध करणे इत्यादी शिक्षेस संबधित उमेदवार पात्र राहील. संबधित उमेदवारास शिक्षा देण्याचा अंतिम अधिकार शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा राहील.

१२) उमेदवारांनी कागदाची बचत म्हणून उत्तरपत्रिकेतील पृष्ठांच्या दोन्ही बाजूस लिहिणे बंधनकारक राहील.

१३) उत्तरपत्रिकेवर ओळख पटेल असे कोणतेही आक्षेपार्ह लिखाण आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ चे शासन पत्रान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय महाविद्यालये / संस्था / वसतिगृहे व विभागीय सहसंचालक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक संवर्गाची विभागीय परीक्षा व अधिक्षक गट-क पदावरील पदोन्नती करीता आवश्यक असलेल्या पर्यवेक्षकीय परीक्षेचा अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे.

**विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेचे स्वरुप स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**

सदरची बाब आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व शासकीय महाविदयालये / संस्था / शासकीय अध्यापक महाविदयालये / भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे / शासकीय वसतिगृहे / ई.बी.सी. वसतिगृह या सर्व कार्यालयीन आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांना (प्रतिनियुक्तीवर / रजेवर असलेल्या उमेदवारासह) विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा व पर्यवेक्षकीय परीक्षा याबाबत आपल्यास्तरावरुन अवगत

करण्यात यावे. तसेच विहित कालावधीत आवेदनपत्र सादर करण्यापासून कर्मचारी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सुलभ संदर्भासाठी अभ्यासक्रम व विहित अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 09-07-2024 17:43:26

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत : सर्व प्राचार्य / संचालक, शासकीय महाविदयालये / संस्था / शासकीय अध्यापक महाविदयालये / भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण केंद्रे यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या अधिपत्याखालील
**कनिष्ठ लिपिक पदासाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा- २०२४**
आवेदनपत्र

ठिकाण : . . . . . . . . . . . . . .
दिनांक : . . . . . . . . . . . . . .

प्रति,
मा.शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

महोदय,

लिपिकांसाठी असलेल्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२४ साठी मी बसू इच्छिते / इच्छितो. माझी माहिती खालील प्रमाणे आहे.

आडनाव नाव वडीलांचे नाव

१ संपूर्ण नाव :
२ पद :
३ मोबाईल नंबर :
४ ई-मेल आयडी :
५ कार्यालयाचे नाव व पत्ता :

६ एकूण झालेली सेवा :
७ आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गात उपस्थित असल्यास कालावधी :
८ धनाकर्षाबाबतची (Demand Draft) माहिती :

| डी.डी.क्रमांक | दिनांक | बँकेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| | | | |

आपला / आपली विश्वासू,

(. )

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

दिनांक : कार्यालय प्रमुखांची सही व पदनाम

(टिप : हा अर्ज विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत पाठवावा.)

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांच्या अधिपत्याखालील
**पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा- २०२४**
आवेदनपत्र

ठिकाण : . . . . . . . . . . . . . .
दिनांक : . . . . . . . . . . . . . .

प्रति,

मा.शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

महोदय,

पर्यवेक्षकीय पदासाठी असलेल्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२४ साठी मी बसू इच्छिते / इच्छितो. माझी माहिती खालील प्रमाणे आहे.

आडनाव नाव वडीलांचे नाव

१ संपूर्ण नाव :

२ पद :

३ मोबाईल नंबर :

४ ई-मेल आयडी :

५ कार्यालयाचे नाव व पत्ता :

६ एकूण झालेली अखंड सेवा :

७ धनाकर्षाबाबतची (Demand Draft) माहिती :

| | डी.डी.क्रमांक | दिनांक | बँकेचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

आपला / आपली विश्वासू,

(. )

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

दिनांक : कार्यालय प्रमुखांची सही व पदनाम

(टिप : हा अर्ज विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत पाठवावा.)

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**
**पेपर क्रमांक एक करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - १ (कार्यालयीन व्यवस्थापन) (पुस्तकाशिवाय)** **(गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | शिक्षण संचालनालयाची (उच्च शिक्षण) संरचना | १० |
| २ | अधिकारी व कर्मचारी पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या | १० |
| ३ | शासकीय आस्थापना / महाविद्यालये / संस्था / वसतीगृह संरचना | १० |
| ४ | शिक्षण शुल्क समिती रचना व कार्यपध्दती | १० |
| ५ | वेतन पथक संरचना व कार्यपध्दती | १० |
| ६ | उच्च शिक्षण विभागातील विविध शिष्यवृत्ती / सवलत योजना | १० |
| ७ | उच्च शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना | १० |
| ८ | न्यायालयीन कामकाज कार्यपध्दती | १० |
| ९ | ई-ऑफिस कार्यपध्दती | १० |
| १० | मा. संसद सदस्य व मा. राज्य विधान मंडळाच्या सदस्यांना शासनाच्या कार्यालयामध्ये सौजन्यपूर्ण वागणूक देण्याबाबत मार्गदर्शक सूचना | १० |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**
**पेपर क्रमांक दोन करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - २ (कार्यालयीन पध्दती, टिप्पणी, मसुदा लेखन) (पुस्तकाशिवाय) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | टपाल आवक, नोंदणी व वितरण कार्यपध्दती | १० |
| २ | विविध प्रकारच्या नोंदवह्या | १० |
| ३ | आवक पत्रांवरील कार्यवाही | १० |
| ४ | टिप्पणी लेखन कार्यपध्दती | १५ |
| ५ | मसुदा लेखन व प्रकरण सादर करणे कार्यपध्दती | १५ |
| ६ | पत्रे निर्गमित करणे कार्यपध्दती | १० |
| ७ | फायलींना क्रमांक आणि निर्देशांक देणेबाबतची कार्यपध्दती | १० |
| ८ | अभिलेखन, अभिलेखांचे वर्गीकरण कार्यपध्दती | १० |
| ९ | विधानमंडळ कार्यपध्दती, त्याअनुषंगाने येणाऱ्या तारांकित, अतारांकित प्रश्न, कपात सूचना / प्रश्न, उत्तरे पाठविण्याची कार्यपध्दती | १० |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**
**पेपर क्रमांक तीन करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - ३ (सर्वसाधारण अधिनियम व नियम) (पुस्तकांशिवाय) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | नवीन अशासकीय महाविद्यालय परवानगी, पायाभूत सुविधांचे निकष | १० |
| २ | अशासकीय महाविद्यालय वेतन अनुदान कार्यपध्दती | १५ |
| ३ | अशासकीय अनुदानित महाविद्यालय आकृतीबंध (शिक्षकेतर) | १० |
| ४ | शासकीय / अशासकीय महाविद्यालयातील अध्यापकांचा सेवाखंड | १० |
| ५ | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था व्यवस्थापन कायदा, १९७६ | १० |
| ६ | प्राचार्य, सहायक प्राध्यापक व इतर समकक्ष पदासाठीच्या विहित शैक्षणिक अर्हता | १५ |
| ७ | महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम २०१३ | १० |
| ८ | शिक्षकीय पदांचे विविध वेतन आयोग - वेतनश्रेणी / करीअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत पदोन्नती नियम / निकष / कार्यपध्दती | १० |
| ९ | शिक्षक-शिक्षकेतर पदभरती आरक्षण व महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रियेमधील आरक्षण | १० |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**
**पेपर क्रमांक चार करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - ४ (महाराष्ट्र नागरी सेवा नियम व अधिनियम) (पुस्तकासह) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबतचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ | १० |
| २ | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ | १० |
| ३ | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ | १० |
| ४ | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ | १० |
| ५ | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ | १० |
| ६ | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ | १० |
| ७ | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवाजेष्ठता विनियमन) नियमावली, २०२१ | १० |
| ८ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ (सेवा हमी कायदा) | ०५ |
| ९ | महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ | १० |
| १० | अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ | १० |
| ११ | आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ | ०५ |
|  | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर परीक्षा**
**पेपर क्रमांक पाच करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - ५ (लेखे व वित्तीय कार्यपध्दती) (पुस्तकासह) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मुंबई वित्तीय नियम, १९५९ | १५ |
| २ | वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती नियम, १९६१ | १५ |
| ३ | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ | १० |
| ४ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ | १५ |
| ५ | महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका | १० |
| ६ | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९९८ | १० |
| ७ | शासकीय विभाग कार्यालयीन खरेदीसाठीची कार्यपध्दती | १० |
| ८ | वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग-पहिला, उपविभाग- १ ते ५ शासन निर्णय दिनांक १७ एप्रिल २०१५. | १५ |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**पर्यवेक्षकीय परीक्षा अभ्यासक्रम**
**पेपर क्रमांक एक करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - १ (उच्च शिक्षण विभागातील प्रशासकीय कामकाज) (पुस्तकाशिवाय)(गुण - १००, वेळ - ३ तास)**
**घटक :**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | शिक्षण संचालनालयाची (उच्च शिक्षण) संरचना | १० |
| २ | अधिकारी व कर्मचारी पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या | १५ |
| ३ | शासकीय आस्थापना / महाविद्यालये / संस्था / वसतीगृह संरचना | १० |
| ४ | उच्च शिक्षण विभागातील विविध शिष्यवृत्ती / सवलत योजना | १५ |
| ५ | उच्च शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना | १५ |
| ६ | शिक्षण शुल्क समिती रचना व कार्यपध्दती | ०५ |
| ७ | वेतन पथक संरचना व कार्यपध्दती | १० |
| ८ | महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ | ०५ |
| ९ | संचालनालयाच्या अखत्यारीतील विविध चरित्र साधन समिती रचना व कार्यपध्दती | ०५ |
| १० | न्यायालयीन कामकाज कार्यपध्दती | १० |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**

**पर्यवेक्षकीय परीक्षा अभ्यासक्रम**

**पेपर क्रमांक दोन करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - २ (उच्च शिक्षण विभागातील नियम / अधिनियम) (पुस्तकाशिवाय) (गुण - १००, वेळ - ३ तास)**
**घटक :**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | अशासकीय महाविद्यालयांची अनुदान कार्यपध्दती | १० |
| २ | अशासकीय अनुदानित महाविद्यालय आकृतीबंध (शिक्षकेतर) | १० |
| ३ | अनुदान निर्धारण कार्यपध्दती | १० |
| ४ | अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ | १० |
| ५ | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था व्यवस्थापन कायदा, १९७६ | १० |
| ६ | प्राचार्य, सहायक प्राध्यापक व इतर समकक्ष पदासाठीच्या विहित शैक्षणिक अर्हता | १० |
| ७ | महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी अधिनियम, २०१३ | ०५ |
| ८ | समुह विद्यापीठ मार्गदर्शक तत्वे व प्रकल्प अहवाल | ०५ |
| ९ | शिक्षकीय पदांचे विविध वेतन आयोग - वेतनश्रेणी / करीअर ॲडव्हान्समेंट स्कीम अंतर्गत पदोन्नती नियम / निकष / कार्यपध्दती | १० |
| १० | नवीन अशासकीय महाविद्यालय परवानगी, पायाभूत सुविधांचे निकष | १० |
| ११ | अशासकीय महाविद्यालय / अकृषी विद्यापीठे यांमधील अनुकंपा नियुक्ती धोरण | १० |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**पर्यवेक्षकीय परीक्षा अभ्यासक्रम**
**पेपर क्रमांक तीन करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - ३ (महाराष्ट्र नागरी सेवा नियम व अधिनियम) (पुस्तकासह) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबतचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ | ०५ |
| २ | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ | १० |
| ३ | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ | ०५ |
| ४ | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ | ०५ |
| ५ | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ | १० |
| ६ | महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ | ०५ |
| ७ | महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या कालावधीतील प्रदाने) नियम, १९८१ | १० |
| ८ | महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ | १० |
| ९ | महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८१ | १० |
| १० | अपंग व्यक्ती कायदा (समान संधी, हक्क संरक्षण व सहयोग) नियम २०१६ | ०५ |
| ११ | महाराष्ट्र नागरी सेवा (सेवाजेष्ठता विनियमन) नियमावली, २०२१ | ०५ |
| १२ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ (सेवा हमी कायदा) | ०५ |
| १३ | महाराष्ट्र विभागीय चौकशी नियम, १९९१ | ०५ |
| १४ | महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ | ०५ |
| १५ | आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ | ०५ |
| | एकूण | १०० |

**विभाग - उच्च शिक्षण विभाग**
**पर्यवेक्षकीय परीक्षा अभ्यासक्रम**
**पेपर क्रमांक चार करीता गुणांचा आराखडा**

**पेपर - ४ (लेखे व वित्तीय कार्यपध्दती) (पुस्तकासह) (गुण - १००, वेळ - ३ तास)**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | मुंबई वित्तीय नियम, १९५९ | १० |
| २ | वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती नियम, १९६१ | १० |
| ३ | महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ | १० |
| ४ | महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ | १० |
| ५ | गट विमा योजना, १९८२ | १० |
| ६ | राष्ट्रीय निवृत्ती योजना | १० |
| ७ | महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका | १० |
| ८ | महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियम, १९९८ | १० |
| ९ | शासकीय विभाग कार्यालयीन खरेदीसाठीची कार्यपध्दती | १० |
| १० | वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग-पहिला, उपविभाग- १ ते ५ शासन निर्णय दिनांक १७ एप्रिल २०१५. | १० |
| | एकूण | १०० |